वाचले,

१) आदेश क्र.ई-गव्हर्नन्स/२/कावि/५६३/२०१४ दि.०४/०८/२०१४

२) मा.स्थायी समिती सभा ठराव क्र.१५८९३ दि०५/०४/२०१६

३) क्र.नासुकें/१/कावि/४३६/२०१७ दि.३१/१०/२०१७

४) मा.आयुक्त सो.यांनी मान्य केलेला दि.२१/१०/२०१७ रोजीचा प्रस्ताव.

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी – ४११ ०१८.
नागरी सुविधा केंद्र,
क्र.नासुकें/१/कावि/ ५४८ /२०१७
दिनांक :- ३० /१२/२०१७

**विषय :- अ व फ क्षेत्रीय कार्यालयामधील नागरी सुविधा केंद्राचे मुदतवाढीबाबत...**

**आदेश,**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील नागरीकांच्या सोयीसाठी खाजगी तत्वावर नागरी सुविधा केंद्र सुरु करणेकामी केंद्र चालक नियुक्ती साठी अर्ज मागविणेत आलेले होते. परंतु, अ व फ क्षेत्रीय कार्यालयाचे कार्यक्षेत्रामधून नागरी सुविधा केंद्रासाठी अर्ज प्राप्त न झाल्याने नागरीकांच्या सोयीसाठी वाचले क्र.१ चे आदेशान्वये अ क्षेत्रीय कार्यालयाच्या तळमजल्यावरील नागरी सुविधा केंद्रामध्ये भाडे तत्वावर जागा उपलब्ध करुन खाजगी तत्वावर नागरी सुविधा केंद्र चालविणेकामी परवानगी देणेत आलेली आहे.

मा.स्थायी समितीकडील वाचले क्र.२ चे ठरावान्वये श्रीम.संजना सोनावणे यांना अ व फ क्षेत्रीय कार्यालयाचे कार्यक्षेत्रात नव्याने नागरी सुविधा केंद्र स्थापन होईपर्यंत कार्योत्तर मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार वाचले क्र.३ चे आदेशान्वये श्रीम.सोनावणे यांना दिलेली शेवटची मुदत ही दि.३१/१२/२०१७ रोजी संपुष्टात आली आहे. तरी नव्याने नागरी सुविधा केंद्र सुरु होईपर्यंत तेथील कार्यक्षेत्रातील नागरीकांची गैरसोय होऊ नये यासाठी अ व फ क्षेत्रीय कार्यालयाचे कार्यक्षेत्रात नागरी सुविधा केंद्राची आवश्यकता आहे.

सबब मी, आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी या आदेशान्वये श्रीम.संजना संदिप सोनावणे यांना उपरोक्त वाचले क्र.१ चे अटी व शर्ती आणि करारनाम्यातील अटी व शर्तींनुसार अ क्षेत्रीय कार्यालयाचे तळघरातील नागरी सुविधा केंद्र चालू ठेवणेकामी पुढील तीन महिन्यांकरिता म्हणजेच **दि.३१/०३/२०१८** पर्यंत मुदतवाढ देणेस मान्यता देत आहे.

आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी – ४११ ०१८

प्रति – श्रीम.संजना संदिप सोनावणे, केंद्र चालक

प्रत – १) भूमि आणि जिंदगी विभाग, मुख्य कार्यालय
२) अ क्षेत्रीय कार्यालय, भूमि आणि जिंदगी विभाग
३) माहिती व तंत्रज्ञान विभाग
४) लेखा विभाग
५) नागरी सुविधा केंद्र, टेबल क्र.३ व ४

**प्रशासन अधिकारी (ना.सु.कें.)**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी – ४११ ०१८